27 FEB 2021
सकाळ

जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मराठी अधिविभागाला चार साहित्यकृतींचे तोरण



मतीन शेख : सकाळ वृत्तसेवा

## » मराठी राजभाषा दिन विशेष

कोल्हापूर, ता. २६ शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अधिविभागाने दिलेल्या शब्दसंस्कारांच्या बळावर चार विद्यार्थ्यांनी साहित्य क्षेत्रात दमदार पाऊल टाकले आहे. त्यांच्या पाच साहित्यकृतींनी विभागाला सृजनशीलतेचे नवे तोरण बांधले असून, यातील एका विद्यार्थ्यांच्या साहित्य कृतीने थेट राष्ट्रीय पुरस्कारावर शिक्कामोर्तब केले. केवळ अभ्यासक्रमाच्या गोतावळ्यात न रमता त्यांचा शब्दभंडारातील हा प्रवेश नवोदित विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करणारा आहे. विभागाच्या नवनाथ गोरे, डॉ. दत्ता घोलप, विष्णू पावले, डॉ. सयाजीराव गायकवाड यांनी नवनिर्मितीची नवी वाट तयार केली. माजी विभागप्रमुख डॉ. राजन गवस, विभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे यांनी या लिहित्या हातांना ऊर्मी व आत्मविश्वास दिला.

### जीवनानुभवाची समृद्ध 'फेसाटी'

दुष्काळी जत तालुक्यातील एका छोट्या गावातून मजुरी करणाऱ्या कुटुंबातून नवनाथ गोरे एम.ए. करण्यासाठी विभागात आला. मनात ग्रामीण भागातून आल्याचा न्यूनगंड; पण विष्णू पावले या लिहित्या मित्रामुळे आपणही आपले जग लिहावे असे त्याला वाटले. सुरुवातीला त्याने कथा लिहिल्या. पुढे आपलीच मोठी गोष्ट लिहिली. मराठी विभागाने नवलेखक अनुदान योजनेतून प्रसिद्धीसाठी साहित्य सांस्कृतिक मंडळाकडे पाठवली. अनुभवाची दाहक वास्तवता शब्दबद्ध केलेल्या नवनाथच्या फेसाटीने साहित्य अकादमीच्या युवा पुरस्कारावर नाव कोरले.

### कादंबरी समीक्षेची नवी परिभाषा

बार्शी तालुक्यातून आलेल्या दत्ता घोलप यांना पुस्तकांबद्दल, पुस्तकातील जगाबद्दल सदैव कुतूहल अन् ओढ. दत्ता यांनी एम.ए.नंतर काही वर्षे 'सीएचबी' केली; मात्र यातही वाचक जागृत ठेवला. त्याने बहुविध वाचन केले. पीएचडीसाठी भालचंद्र नेमाडे यांचे साहित्य निवडत ते पूर्णही केले. मराठी कादंबरीचा समाज-सांस्कृतिकदृष्ट्या अभ्यास सुरू ठेवला आणि मराठी कादंबरीचा आशय आणि आविष्कार हा समीक्षाग्रंथ पुढे प्रसिद्ध केला. साहित्य वर्तुळात या नव्या समीक्षकाची चर्चा झाली. या साहित्य कृतीसाठी त्यांना महाराष्ट्र साहित्य परिषदेचा युवा समीक्षक पुरस्कारही मिळाला.

### विष्णू पावलेचे प्रगल्भ गद्य पाऊल

चांदोली धरणाजवळील पावलेवाडीतून शिक्षणासाठी तो आलेला. 'कमवा आणि शिका'मध्ये काम करीत त्याने एम.ए. केले.

आपण खूप वाचावं, खूप ऐकावं आणि लिहावं असं त्याला वाटायचं. शब्दांशी, अक्षरांचे नाते जपले. त्याने राजस्थान भेटीचा वृत्तांत आपल्या खास शैलीत 'पधारो म्हारो देस' मध्ये मांडला आहे. तेथील कला, साहित्य संस्कृतीचे चित्रण या पुस्तकातून उभे केले आहे.

### पोवाड्याचे स्वरूप विशद करणारा ग्रंथ

कथा, कविता, कादंबरीसह पोवाडा, लावण्या, शाहिरीकडे ओढा असणाऱ्या माळशिरस तालुक्यातील सयाजी गायकवाड यांनी एम.ए. नंतर 'स्वातंत्र्योत्तर मराठी पोवाडा' या विषयात संशोधन करत पीएच.डी. मिळवली. स्वातंत्र्यपूर्व काळातील मराठी पोवाड्याचे स्वरूप विषद करणाऱ्या ग्रंथाची त्यांनी निर्मिती केली आहे.



जनसपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मराठी भाषा समृध्द करण्यासाठी विविध प्रयोग व्हावेत

## वसंत भोसले : शिवाजी विद्यापीठात व्ही. एन. शिंदे, अनुप जत्राटकर यांचा सत्कार : मराठी विभागातर्फे मराठी भाषा गौरव दिन कार्यक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** विविध क्षेत्रातील लोकांचे लेखन, इतर भाषा आणि त्यातील साहित्य स्वीकारून त्याचा अनुवाद करणे, असे विविध प्रयोग मराठी भाषा समृध्द करण्यासाठी व्हावेत. मराठीला ज्ञानभाषा बनविण्यासाठी विज्ञान-तंत्रज्ञान, वैद्यक, अभियांत्रिकी आदी सर्व विद्याशाखांचे ज्ञान, माहिती मराठी भाषेमध्ये यावी, असे प्रतिपादन 'लोकमत'चे संपादक वसंत भोसले यांनी शुक्रवारी केले.



कोल्हापुरात शुक्रवारी शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अधिविभागातर्फे मराठी भाषा गौरव दिनानिमित्त शासनाच्या उत्कृष्ट वाड्मयनिर्मिती पुरस्कार विजेते डॉ. व्ही. एन. शिंदे आणि दिग्दर्शक अनुप जत्राटकर यांचा 'लोकमत'चे संपादक वसंत भोसले यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी डावीकडून डॉ. नंदकुमार मोरे, रणधीर शिंदे, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के उपस्थित होते.

शिवाजी विद्यापीठातील मराठी अधिविभागातर्फे मराठी भाषा गौरव दिनानिमित्त भौतिकशास्त्र विभागाच्या सभागृहात आयोजित शासनाच्या उत्कृष्ट वाङ्मयनिर्मिती पुरस्कार विजेत्या लेखकांच्या सत्कार कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. शासनाचा महात्मा फुले वाङ्मय पुरस्कार विजेते डॉ. व्ही. एन. शिंदे आणि विजय तेंडुलकर वाङ्मय पुरस्कार विजेते अनुप जत्राटकर यांचा सत्कार संपादक वसंत भोसले यांच्याहस्ते शाल, पुस्तक, गुलाबपुष्प देऊन करण्यात आला.

विविध क्षेत्रातील लोकांनी मराठीत लेखन करावे. त्याहष्टीने डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी विज्ञान लेखनाचे टाकलेले पाऊल उल्लेखनीय असून त्यांनी यापुढेही लेखन सुरू ठेवावे. अनुप जत्राटकर यांनीही एकांकिका लेखनाच्या माध्यमातून मराठी भाषेला बळ देण्याचे काम केले असल्याचे संपादक भोसले यांनी सांगितले.

मराठीत बोलणे, वाचणे, लिहिणे केले, तरच ही भाषा समृध्द होईल. त्याहष्टीने मराठी विभागाचे सुरू असलेले प्रयत्न कौतुकास्पद असल्याचे कुलगुरू डॉ. शिर्के यांनी सांगितले. 'लोकमत'मधील लेखांमुळे पुस्तक लिहिले. त्यासाठी प्रेरणा देणाऱ्या संपादकांच्याहस्ते माझा सत्कार झाल्याने एक वर्तुळ पूर्ण झाले. समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविण्यासाठी विज्ञानाचा हात धरून लेखन क्षेत्रात वाटचाल करणार असल्याचे डॉ. शिंदे यांनी सांगितले. 'निष्पर्ण'मध्ये स्त्रियांची मानसिकता मांडली आहे. या पुरस्काराने माझी जबाबदारी वाढली असल्याचे दिग्दर्शक जत्राटकर यांनी सांगितले. यावेळी डॉ. केशव राजपुरे, आर. जी. सोनकवडे, आलोक जत्राटकर आदी उपस्थित होते. मराठी अधिविभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले.

### मराठी चित्रपटांबाबत विचार गरजेचा

न्यूयॉर्क शहरात १९३ भाषा लिहिता-वाचता येणारे, तर ८०० बोलीभाषा बोलणारे लोक राहतात. जगभरातील सांस्कृतिक, साहित्यिक आदान-प्रदानाचे ते केंद्रच बनले आहे. दाक्षिणात्य प्रादेशिक भाषांतील चित्रपट जगाची भाषा बोलत असून, त्यांची स्वीकारार्हता वृद्धिंगत करताना त्यांच्या तुलनेत मराठी चित्रपट कमी पडताहेत का? याचा विचार करण्याची गरज असल्याचे संपादक भोसले यांनी सांगितले.

### कुस्ती, चित्रपटांचा इतिहास विद्यापीठाने लिहावा

मराठी भाषा समृद्धीसाठी लोकमतने सातत्याने नवे प्रयोग केले आहेत. कोयन प्रकल्पाच्या निर्मितीवर पुस्तक लिहिण्याचे काम डॉ. शिंदे यांनी करावे. कोल्हापुरी कुस्ती आणि मराठी चित्रपटांच्या इतिहासाचे लेखन विद्यापीठाकडून व्हावे, असे संपादक भोसले यांनी यावेळी सुचविले. याबाबत विद्यापीठ निश्चितपणे विचार करेल, असे कुलगुरू डॉ. शिर्के यांनी सांगितले.